# ५२. यशाचे व्यवस्थापन (Success Management)

माझा एक आावडता प्रश्न आहे. यश म्हणजे काय ? ऐकणारा तर गडबडतोच बहुतेकवेळा. थोडया वेळातच तो सावरतो आणि मग बरीच उलटसुलट उत्तरे ऐकावयास मिळतात. कोणासाठी यश म्हणजे भरपूर पैसा असतो , मान मरातब असतो , संपत्ती असते , नोकरचाकर ठेवण्याची ऐपत , चांगली नोकरी , चांगली बायको व मुले. अगदी काहीही उत्तर असते. ही उत्तरे चुकीची आहेत असे मला म्हणायचे नाही पण बराचसा हा कल्पना विलासाचा खेळ असतो. आपल्याकडे जे नाही ते मिळाविणे म्हणजे यश असेच बरेच वेळा असते. उत्तर माणसागणिक बदलते.

काय म्हणालात ? माझे उत्तर काय आहे ? थांबा ते तर तुम्हाला कळेलच.

यशाची गुरूकिल्ली असेल ना ? एकदा मी माझा मित्र जयंत याबरोबर चर्चा केली व माझ्या मते यशाची गुरूकिल्ली किंवा हल्लीच्या जगातील **Formula** बनविला. **Success = Basic intelligence × Hard Work × Luck.**

कोणाच्याही गोष्टीत यश मिळविण्यासाठी या ३ गोष्टींची आवश्यकता असते. किमान बुद्धीमत्ता , श्रम करायची तयारी व नशीब.

आपल्या बुद्धिमत्तेची कुवत आपण ओळखू शकतो. पण ही कुवत नुसती ओळखून उपयोग नाही तर ती स्वीकारलीसुद्धा पाहिजे.

आपण किती नशीब घेऊन जन्माला आलो आहोत हे तर जगजाहीरच असते.

सर्वात महत्वाचे म्हणजे काम /श्रम करायची तयारी. श्रम करायची कुवत सर्वांकडे असू शकते पण त्याचबरोबर श्रम करायची इच्छा नसेल तर काही उपयोग नाही.

माणसाला जर यश मिळवायचे असेल ( यशाचे उत्तर काहीही असो ) तर खालील गोष्टींचा विचार करणे आवश्यक आहे असे मला वाटते.

१. **Goal:** स्वतःचे ध्येय काय हे प्रथम ठरवले पाहिजे. अर्थात स्वप्नरंजन येथे अपेक्षित नाही. ध्येय ठरविण्यासाठी आपली कौटुंबिक परिस्थिती , नशीब , आपले गुण व दोष यांचा विचार आवश्यक आहे. ध्येयपूर्तता होण्याची शक्यता असली तरच त्या ध्येयाला अर्थ आहे. शाळेत ५०% मार्क मिळविणारा डॉक्टर व्हायची स्वप्ने बघत असेल तर ते चूक आहे.

२. **Magic Stick:** जादुची कांडी.

प्रत्येक माणसाकडे चांगले / वाईट गुण असतात. आपलेही अंगभूत गुण ओळखता आले पाहिजे व आपल्या ह्या गुणांवर जे मिळविणे शक्य आहे त्यासाठी वाटचाल करणे आवश्यक आहे.

३. **Discriminate:** फरक करता आला पाहिजे.

जेव्हा आपल्याला कोणतीही गोष्ट मिळवायची असते तेव्हा फरक करण्याची कला अवगत असणे आवश्यक असते. महत्वाचे व कमी / बिन महत्वाचे काय ही वर्गवारी करता आली पाहिजे. श्रेय व प्रिय ठरविता आले पाहिजे. जे श्रेयस्कर आहे ते प्रिय असेलच असे नाही व जे प्रिय आहे ते श्रेयस्कर असेलच असे नाही. उ.दा. बटाटावडा आपल्याला प्रिय असतो पण एका मर्यादिपलिकडे जास्त बटाटेवडे खाणे श्रेयस्कर नसते. तसेच कोणते काम तातडीचे व निकडीचे आहे हे ठरविले पाहिजे.

4. **Sincerity & Devotion :**

कोणतेही काम तन मन अर्पण करून केले पाहिजे. ही गोष्ट साध्य झाल्यावर पैसा, ऐश्वर्य किती मिळेल हा विचार काम करताना डोकावता कामा नये. काम पूर्ण करण्याचा अवर्णनिय आनंद म्हणजे काय हे जाणायचे असेल तर एवढे करता आले पाहिजे.

५. **Skill:** आपल्या गुणांची ताकद कायम ठेवायची असेल तर सतत कार्यरत व सराव टिकवता आला पाहिजे. उ.दा. खेळाडू. सैनिक.

६. **Over come Difficulties :**

कोणत्याही कार्यात विघ्ने येणारच पण संकटांनी मन विचलित होता कामा नये. हे जग तुम्हाला मौजमजा करण्यासाठी बनविले नाहिये तर तुम्हाला अनुभवांनी शहाणे करण्यासाठी बनविले आहे.

७. **Meditation:** देवाची भक्ती. हा एक खूप मोठा मुद्दा आहे. मला एवढेच सांगायचे आहे की अदृश्य शक्तीचे भान सदैव असू द्या. त्या शक्तीवर विश्र्वास ठेवा पण उगाच फापटपसा-यात अडकू नका. आजचा दिवस कालच्यापेक्षा चांगला होता असे माना. संकट समयी देवाकडे संकटाचा मुकाबला करण्याची शक्ती मागा. सगळी संकटे मलाच का म्हणून देवाकडे भांडू नका.

८. **Open Approach:** मनाची कवाडे उघडी ठेवा. कोणत्याही गोष्टीबद्यल हटवादी भूमिका नको. प्रत्येक गोष्टीचा भावार्थ समजून त्याकडे बघा.

९. **Positive Attitude:** आयुष्यात सकारात्मक दृष्टीकोन ठेवा. कोणताही नकारात्मक विचार / वाक्य ' तरी बरं ' (**Thank God**) ने सुरवात करून म्हणा. बघा काय आश्र्चर्यकारक फरक पडतो. तेच नकारात्मक वाक्य / विचार सकारात्मक होतो.

उ.दा. आजपण **Train** उशीरा आहेत, ऑफीसात कसे काय वेळेवर पोचणार. दुपारपर्यंत एक **Urgent** काम करायचे होते. हाच त्रागा खालीलप्रमाणे होऊ शकतो.

तरी बरं गाडीला **Accident** झाला नाहीये. थोडा उशीर होईल पण फारसे काही बिघडणार नाही. गाडी पटरीपे तो है. रूळावरून गाडी उतरली की मग ऑफीसला दांडीच नाही का. काय पटलं का ?

पाय मागे खेचणारे लोक ओळखता आले तर काम बरेचसे सोपे होईल.

१०. **Action:** सर्वात शेवटी **Action** ही महत्वाची. आज जे काम करणे आवश्यक आहे ते काम आजच केले पाहिजे. मोठया मुश्किलीने माणसाचा जन्म मिळाला आहे ४ दिवस. जर का त्यातले २ दिवस काय मिळवावे हे ठरविण्यात घालविले व २ दिवस वाट बघण्यात गेले तर वजाबाकी शून्यच.

शेवटी मी एवढेच म्हणेन की प्रामाणिकपणे श्रम करा, कामाचा आनंद घ्या. जे मिळवाल ते प्रमाणशीर असू दे. एखादीच गोष्ट जास्त मिळाली व इतर गोष्टी कमी / नाही मिळाल्या तर मिळालेल्या गोष्टींचाही आनंद घेता येणार नाही. पैसा जीवनासाठी आवश्यक आहे पण भरपूर पैसा मिळाल्यानंतर तो सुरक्षित ठेवण्यासाठी मनाची शांति टिकणार नसेल किंवा पैशाचा उपभोग घेता येत नसेल ( तब्बेतीपायी ) तर त्या पैशाचा काय उपयोग ?

काय मित्रांनो कसला विचार करताय ? कसे यशस्वी व्हावे ? माझ्या शुभेच्छा तुमच्या वाटचालीला.

अरे हो तुम्हाला यशाबद्यलची माझी मते सांगायची राहूनच गेली. माझ्या मते यश म्हणजे आपल्या शिक्षणाचा व बुद्धिचा वापर करण्यासाठी लायक काम मिळणे, गरजेपेक्षा जास्त पैसा मिळणे कि त्यामुळे समाजाला मदत करता येईल, प्रेमळ कौटुंबिक संबंध, चांगले आरोग्य, जीवाभावाचे मित्र, मनःशांति, निस्वार्थी विचार, नशीबाची साथ, संकटसमयी न डगमगणारे मन. बस आणखिन काय पाहिजे असतं माणसाला **!!**

**'You may not get that you want but you can love what you get** अशी मनोवृत्ती.'